सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०९२१/प्र.क्र.४२/२०२३/जाहिरात दिनांक: १७ जानेवारी, २०२४

## -: शुध्दीपत्रक :-

**विषय : प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक, शासकीय औषधनिर्माण महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक- ०४३/२०२३, ०४४/२०२३ व ०५०/२०२३**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मागणीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक, शासकीय औषधनिर्माण महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ या संवर्गाच्या जाहिराती (अनुक्रमे ०४४/२०२३, ०४३/२०२३ व ०५०/२०२३) आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तथापि, शासनाने विषयनिहाय मागणीपत्र न पाठविल्याने मागणीपत्रात दर्शविल्यानुसार संवर्गनिहाय जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या.

**२.** विषयांकित सर्व संवर्गांकरीता महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ अनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये / संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, दिनांक ११ एप्रिल, २०२२ अन्वये पदभरतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. याबाबत शासन पत्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.(११८/२१)भाग-१७/तांशि-१, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक, शासकीय औषधनिर्माण महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ या संवर्गांकरीता भरावयाच्या विषयनिहाय पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | विषय | प्राध्यापक, गट-अ (जा.क्र.०४४/२०२३) | सहयोगी प्राध्यापक, गट-अ (जा.क्र. ०४३/२०२३) | सहायक प्राध्यापक, गट-अ (जा.क्र.०५०/२०२३) |
|---|---|---|---|---|
| 1 | Pharmaceutical Chemistry (Including Pharmaceutical Analysis) | ०२ | ०१ | ०१ |
| 2 | Pharmaceutics | ०३ | ०१ | ०० |
| 3 | Pharmacognosy | ०३ | ०० | ०० |
| 4 | Pharmacology | ०२ | ०१ | ०३ |
| 5 | Pharmacy Practice & related subjects | ०२ | ०१ | ०२ |
| | **Total** | १२ | ०४ | ०६ |

**३.** शासन पत्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.(११८/२१)भाग-१७/तांशि-१, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार उपरोक्त विषयाकरीता कोणती शैक्षणिक अर्हता येते, याबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे:-

| अ. क्र. | विषय | Speciality Subjects of M.Pharm. | Qualification of teaching faculty at M.Pharm. |
|---|---|---|---|
| 1 | Pharmaceutical Chemistry | M.Pharm. (Pharmaceutical Chemistry)<br>M.Pharm. (Pharmaceutical Analysis)<br>M.Pharm. (Quality Assurance) | Pharmaceutical Chemistry<br>Pharmaceutical Analysis<br>Pharmaceutical Quality Assurance<br>and<br>Combinations of above |
| 2 | Pharmaceutics | M.Pharm. (Pharmaceutics)<br>M.Pharm. (Induatrial Pharmacy)<br>M.Pharm. (Pharmaceutical Technology)<br>M.Pharm. (Regulatory Affairs)<br>M.Pharm. (Pharmaceutical Biotechnology)<br>M.Pharm. (Quality Assurance) | Pharmaceutics<br>Induatrial Pharmacy<br>Pharmaceutical Technology<br>Regulatory Affairs<br>Pharmaceutical Biotechnology<br>Quality Assurance<br>and<br>Combinations of above |
| 3 | Pharmacognosy | M.Pharm. (Pharmacognosy)<br>M.Pharm. (Phytopharmacy & Phytomedicine) | Pharmacognosy<br>Phytopharmacy & Phytomedicine<br>Natural Products<br>and<br>Combinations of above |
| 4 | Pharmacology | M.Pharm. (Pharmacology) | Pharmacology |
| 5 | Pharmacy Practice | M.Pharm. (Pharmacy Practice) | Pharmacy Practice<br>Hospital Pharmacy<br>Clinical Pharmacy<br>Pharm.D.<br>and<br>Combinations of above |

**४.** उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार संवर्गनिहाय आणि विषयनिहाय पदसंख्येनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने,

विषयाधीन संवर्गनिहाय अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार परिच्छेद २ खालील विवरणपत्रात नमूद विषय निवडण्याकरीता **दिनांक १८ जानेवारी, २०२४ ते दिनांक २५ जानेवारी, २०२४** या कालावधीमध्ये विकल्प घेण्याबाबत ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येत आहे. विषयाचा विकल्प निवडीकरीता उमेदवारांनी त्यांच्या प्रोफालइमधील My Account मध्ये जाऊन अर्ज केलेल्या संवर्गाच्या जाहिरातीची निवड करुन त्यामधील Question हे बटन निवडून त्यात नमूद केलेले विषयाचा विकल्प निवडणे आवश्यक आहे. एकदा विषय निवडून Select बटन अंतिम केल्यानंतर पुन्हा विषयाच्या विकल्पामध्ये दुरुस्ती/सुधारणा करता येणार नाही. उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार निवडलेले विषय अंतिम समजण्यात येवून त्या विषयाकरीता त्यांचा विचार करण्यात येईल.

**५.** याकरीता संवर्गनिहाय अर्ज केलेल्या संबंधित उमेदवारांना त्यांच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांकावर तसेच Email ID वर SMS / Email द्वारे सूचित करण्यात येईल. सद्यस्थितीत अर्ज केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि त्यांनी निवडेल्या विषयांचे विकल्प याची पात्रता न तपासता विकल्प स्वीकारण्यात येत आहेत. विहित कालावधीत उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार विषय निवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास, उमेदवाराने त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार विषय निश्चित करुन त्यानुसार त्यांचा विषयाचा विकल्प ठरविण्यात येईल.

**६.** उमेदवारांनी निवडलेले विषय आणि त्यांच्या अर्जातील शैक्षणिक अर्हता यानुसार अर्जांची छाननी करुन त्यानंतर उमेदवारांना पात्र/अपात्र ठरविण्यात येईल. शासनाने कळविलेल्या विषयांव्यतिरिक्त उमेदवारांनी त्यांच्या अर्जात शैक्षणिक विषय नमूद केले असतील, अशा उमेदवारांबाबत अर्जाच्या छाननीचे वेळी निर्णय घेण्यात येऊन पात्र/अपात्र ठरविण्यात येईल.

**७.** जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

**८.** सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०४३/२०२३, ०४४/२०२३ व ०५०/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.